[2] C.C.(3)21.xpdf

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/3836/2013-14 दिनांक :- 1_/_/2013

प्रति,

जमीन/जागामालक - मे. रश्मी प्रॉपर्टीज ॲन्ड मे. रश्मी हौसिंग

अधिकार पत्रधारक - मे. रश्मी प्रॉपर्टीज ॲन्ड मे. रश्मी हौसिंग

द्वारा - वास्तुविशारद - मे. तेजस कन्सलटंट

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - खारी सर्वे क्र./ हिस्सा क्र. नवीन ६२/३ जुना १९९/३ या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि.२०/११/२०१३ चा अर्ज.

२) मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील १०(३),१०(५) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.३००/- च्या स्टॅम्प पेपरवर दि.२४/०९/२०१३ रोजीचे शपथपत्र.

३) दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. ईआय/एनओसी/८०४/२०१३, दि.१८/०१/२०१३ अन्वये नाहरकत दाखला.

४) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/१०२४/२०१२-१३, दि.११/१२/२०१२ अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.

५) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/२७६६/२०१२-१३, दि.२२/१०/२०१२ अन्वये विद्यमान क्षेत्राचा दाखला.

## -: बांधकाम प्रारंभपत्र :- (पुर्नःबांधणी)

(फक्त जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – खारी सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. नवीन ६२/३ जुना १९९/३ या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजुरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.

२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.